विषय : श्री. राजेंद्र लक्ष्मण नागपुरे, सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता यांचा "हलबा" अनुसूचित जमातीचा दावा अवैध ठरविण्यात आलेला असल्याने, श्रेणी-२ संवर्गात देण्यात आलेला राजपत्रित दर्जाचा लाभ काढून घेण्याबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग
आदेश क्रमांक.जि.प.सा.बां./आस्था-२/४३५/२०२६
अहिल्यानगर दिनांक-स्वाक्षरी खाली नमूद केले प्रमाणे

संदर्भ- १) मा. उच्च न्यायालय, मुंबई (High Court of Judicature at Bombay), सिव्हिल अपीलेट ज्युरिस्डिक्शन, रिट याचिका क्र. ८६५४/२०२५
२) मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील आदेश दिनांक ०२/०७/२०२५
३) मा.सहाआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती नाशिक यांचेकडील आदेश दिनांक २९/०१/२०२६
४) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदुरबार यांचेकडील आदेश क्रमांक जि.प./आ.१/९०/२००२ दिनांक २७/०२/२०
५) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-११२३/प्र.क्र.२९/ आरक्षण-२/१६-ब ) दिनांक ४ आक्टोबर २०२४
६) पदोन्नती समितीची बैठक दिनांक १३/७/२०२६ रोजीचे इतिवृत्त.

ज्याअर्थी श्री. राजेंद्र लक्ष्मण नागपुरे, सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता यांनी, अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्रासाठी HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, CIVIL APPELLATE JURISDICTION, WRIT PETITION NO. ८६५४ OF २०२५ ही रिट याचिका दाखल करण्यात आलेली होती. सदर रिट याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १४ जुलै २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार, अनुसूचित जमाती पडताळणी समितीने दिनांक १४ जुलै २०२५ पासून ६ महिनेचे आत निर्णय घेण्याचे निर्देश दिलेले आहेत.

ज्याअर्थी सहाआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नाशिक यांनी जात वैधता प्रमाणपत्र तपासणी बाबत दिनांक २९/०१/२०२६ रोजी आदेश निर्गमित केला असुन, समितीसमोर प्रकरणाच्या सुरुवातीपासुन प्राप्त कागदपत्रे, जबाब, चौकशी अहवाल, अर्जदाराने सादर केलेला लेखी व तोंडी युक्तीवाद, इत्यादी सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून श्री.राजेंद्र लक्ष्मण नागपुरे, हे अनुसूचित जमातीचे नाहीत त्यामुळे त्यांचा हलबा, अनुसूचित जमातीचा दावा अवैध ठरविण्यात आला आहे. तसेच श्री नागपुरे यांनी अनुसुचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेवर सेवेत नियुक्ती मिळविली असल्यास त्यांचेवर महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्रे देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या कलम १० व ११ अन्वये कारवाई करण्यात यावी असे कळविले आहे.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्रे देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या कलम १० (१) नुसार समितीकडुन जातीचे प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्यानंतर ती व्यक्ती सेवेतुन तात्काळ सेवामुक्त केली जाण्यास पात्र ठरेल व नियुक्तीच्या अनुरोधाने अशा व्यक्तीने घेतलेले किंवा प्राप्त केलेले इतर कोणतेही लाभ तात्काळ काढुन घेण्यात येतील १० (२) शासनाने दिलेले कोणतेही वित्तीय लाभ अशा व्यक्तीकडुन वसुल करण्यात येतील अशी तरतुद आहे.

ज्याअर्थी श्री.राजेंद्र लक्ष्मण नागपुरे कनिष्ठ अभियंता यापदावरुन दिनांक ३१/१/२०२६ रोजी नियत वयोमानानुसार उप विभागीय अधिकारी जि.प.सा.बा.उपविभाग नेवासा या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत.

ज्याअर्थी श्री. राजेंद्र लक्ष्मण नागपुरे यांचे मूळ सेवापुस्तक व उपलब्ध दस्ताऐवज पहाता यांना शासकीय सोवाकालावधीमध्ये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांचेकडील आदेश क्रमांक जि.प./आ.१/९०/२००२ दिनांक २७/०२/२००३ अन्वये श्री. आर.एल. नागपूरे कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता चा राजपत्रित दर्जा देणेत येऊन कनिष्ठ अभियंता पदाच्या वेतनश्रेणीस वरिष्ठ वेतनश्रेणी (५ वा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन श्रेणी रु.६५००-२००-१०५००) चा लाभ दिनांक ०१/४/२००२ पासून देण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक ५ मधिल ३(१) दि.४/१०/२०२४ च्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी / कर्मचा-यांचा प्रत्येक ११ महिन्याच्या सेवेनंतरचा १ दिवसाचा तांत्रिक खंड सर्व सेवाविषयक (पदोन्नत्ती व अनुकंपा धोरण वगळुन) व सेवानिवृत्ती विषयक लाभासाठी क्षमापीत करणेत येत आहे. ३(३) अधिसंख्य पदावरील अधिकारी / कर्मचारी पदोन्नत्तीस पात्र नसल्याने त्यांना सेवातंर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही. याप्रमाणे तरतुदी आहेत.

ज्याअर्थी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांचेकडील आदेश क्रमांक जि.प./आ.१/९०/२००२ दिनांक २७/०२/२००३ अन्वये श्री. आर.एल. नागपूरे कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता चा राजपत्रित दर्जा देणेत येऊन कनिष्ठ अभियंता पदाच्या वेतनश्रेणीस वरिष्ठ वेतनश्रेणी (५ वा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन श्रेणी रु.६५००-२००-१०५००) चा लाभ संदर्भ क्रमांक.६ अन्वये काढूण घेणे बाबत समितीने निर्णय घेतलेला आहे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांचेकडील आदेश क्रमांक जि.प./आ.१/९०/२००२ दिनांक २७/०२/२००३ अन्वये श्री. आर.एल. नागपूरे कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता पदाचा राजपत्रित दर्जा देणेत येऊन कनिष्ठ अभियंता पदाच्या वेतनश्रेणीस वरिष्ठ वेतनश्रेणी (५ वा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन श्रेणी रु.६५००-२००-१०५००) चा दिनांक ०१/४/२००२ पासून देण्यात आलेला लाभ श्री नागपुरे यांचे जातवैधता प्रमाणत्र अवैध ठरविणेत आलेने काढुन घेणेत येत आहे. जणु काही श्री नागपुरे यांना शाखा अभियंता राजपत्रीत दर्जा चा लाभ दिलेलाच नाही असे गृहित धरुन त्यांची वेतननिश्चीती व केलल्या वेतननिश्चीतीची पडताळणी करणेत यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.20261104130043असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 14:09:44
आनंद भंडारी (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. राजेंद्र लक्ष्मण नागपुरे, सेवानिवृत्त शाखा अभियंता, पंचायत समिती नेवासा यांना माहितीसाठी.
व्दारा- उप अभियंता, जि.प.सा.बा. उप विभाग नेवासा.

प्रत- उप अभियंता, जि.प.सा.बा. उप विभाग नेवासा.

२/- श्री. राजेंद्र लक्ष्मण नागपुरे, जि.प.सा.बा. उप विभाग नेवासा यांना सदरचा आदेश तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व स्वाक्षरी घेतलेली प्रत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

प्रत - माहितीसाठी.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार.
२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर /नंदुरबार
३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद अहिल्यानगर / नंदुरबार.
४. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर / नंदुरबार.
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा यांना माहितीसाठी.